महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ सोबतच्या "अनुसूची - अ" येथे दर्शविलेल्या "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" विकसित करण्यासंबंधी धोरणामध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र. मऔधो - २०१६/प्र.क्र. २०९/उद्योग-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०५ मार्च, २०१८.

वाचा : १) शासन निर्णय क्र. आयआयआय-पॉलिसी २०१०/प्र.क्र. ७६८/उद्योग-२ दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१३.
२) शासन निर्णय क्र. आयडीसी-२०१५/प्र.क्र. ९३/उद्योग-१४ दि. २७ डिसेंबर २०१६.
३) शासन निर्णय क्र. मऔधो - २०१६/प्र१३.क्र. २०९/उद्योग-२ दि. १५ फेब्रुवारी २०१८.
४) शासन निर्णय क्र. आयडीसी-२०१८/प्र.क्र. ९३/उद्योग-१४ दि. १६ फेब्रुवारी २०१८.

शासन शुध्दीपत्रक :-

महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ "अनुसूची- अ" येथे दर्शविलेल्या "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" विकसित करण्यासंबंधी धोरणामध्ये सुधारणा करण्यासंबंधीचा शासन निर्णय दि. १५ फेब्रुवारी २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४ मधील खालील भाग वगळण्यात येत आहे.

"नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र संदर्भात मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील नियुक्त उच्चाधिकार समिती खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (KEIPL) च्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्रा संदर्भात देखील पुढील कार्यपध्दती निश्चित करेल"

२. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ४ पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

"नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्रासंदर्भात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील नियुक्त उच्चाधिकार समिती या प्रकरणीदेखील निर्णय घेईल. उच्चाधिकार समितीने घेतलेला निर्णय ज्याप्रमाणे नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्रासाठी सिडकोच्या संचालक मंडळाकडे अंतिम कार्यवाहीसाठी पाठवेल, त्याचप्रमाणे खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (KEIPL) च्या औद्योगिक क्षेत्राचा निर्णय घेऊन सदर समिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाकडे अंतिम कार्यवाहीसाठी अग्रेषित करेल."

३. एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासाठी मान्यता दिलेल्या क्षेत्रात औद्योगिक वापरामध्ये खालील बाबी अनुज्ञेय करण्यात येत आहे :-

(अ) उद्योग ४.०

(ब) ॲनिमेशन व रोबोटिक्स.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३०५१७१७५०६८१० असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Shamkant Degaonkar

Digitally signed by Sanjay Shamkant Degaonkar
DN: c=IN, o=Industry, Energy and Labour Department, ou=Government Of Maharashtra, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=de0a2ca7914a3c02f24aa23655f609f41f2d36b0ec57da4c71f19aaf08230a79, serialNumber=56cf8c8577584adc42f070185c585c41084cc34f6683553d21ccacbfa33d4d1f, cn=Sanjay Shamkant Degaonkar
Date: 2018.04.16 14:58:10 +05'30'

(संजय देगांवकर)

सह सचिव (उद्योग),महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, ६ वा मजला, मंत्रालय मुंबई-३२.
३. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
४. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२.
५. अध्यक्ष विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. मंत्री (सर्व) व मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव.
१०. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. अ.मु.स. (उद्योग) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५. प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६. प्रधान सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१७. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पू), मुंबई.
१९. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालयासमोर, मुंबई ३२.

२०. विभागीय आयुक्त (सर्व महसुली विभाग)
२१. आयुक्त, महानगर पालिका (सर्व).
२२. सर्व जिल्हाधिकारी.
२३. संचालक, नगर रचना पुणे.
२४. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२५. उप महानिरिक्षक, मुंद्रांक शुल्क, मुंबई.
२६. निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई.
२७. उद्योग विभागातील सर्व सहसचिव / उप सचिव/ कक्ष अधिकारी.
२८. निवडनस्ती (कार्यासन उद्योग-२).